# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट ३७३-२२** **दिनांक ०५/१२/२०२२**

## बनावट चावीच्या साहाय्याने प्रेयसीच्या बहिणीच्या घरात प्रवेश करुन ५,१६,०००/- रुपयांचा मुद्देमाल चोरी करणा-या आरोपीतास अटक करुन चोरीस गेलेला १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात काशिमिरा पोलीस ठाण्यास यश.

काशिमीरा पोलीस हद्दित राहाणा-या तक्रारदार प्रियंका विकी सिंग हया दिनांक २४/११/२०२२ रोजी १६.०० वा.ते दिनांक २५/११/२०२२ रोजी पहाटे ०२.३० वा.चे दरम्यान कामिनिमित्त घराबाहेर गेल्या असता अज्ञात चोरटयाने तक्रारदार यांचे रहाते घराचा दरवाजा बनावट चावीच्या साहायाने उघडुन कपाटातील ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले एकुण २,३६,०००/- रुपयांचे सोन्याचे दागीने व २,८०,०००/- रुपये रोख रक्कम असा एकुण ५,१६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरीकरुन नेल्याबाबत तक्रार दिल्याने काशीमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ८२७/२०२२ कलम ३८०,४५७ अन्वये दिनांक २६/११/२०२२ रोजी ००:२८ वा.गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस येण्याकरीता काशिमीरा पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी सपोनि/प्रशांत गांगुर्डे व त्यांचे पथकाने नमुद गुन्हयांचे घटनास्थळावरुन मिळुन आलेल्या तांत्रिक बाबीचे विश्लेशन करुन सदर गुन्हयात पाहिजे आरोपीत नामे अभिषेक राजेंद्र सिंग, वय- २६ वर्ष, रा.रुम नं २०३, लक्ष्मीपार्क, विजय पार्क, मिरारोड यांनी केला असल्याबाबत माहिती मिळुन आली. सदर गुन्हयात आरोपीतास ताब्यात घेवुन अधिक चौकशी केली असता फिर्यादी यांची मावस बहिण महेक सिंग वय १८ वर्षे हिचेशी आरोपीचे मैत्रीपुर्वक संबध असुन आरोपीताचे फिर्यादी यांच्या घरी फिर्यादीच्या अनुपस्थित मेहक सिंग हिस भेटण्यासाठी येणेजाणे होते. महेक सिंग हि १७/११/२०२२ रोजी तिच्या राहते गावी फतेहबाद, दिल्ली याठिकाणी निघुन गेली असतांना आरोपीताने महेक सिंग गावी जाण्यापुर्वी संधीचा फायदा घेत फिर्यादी यांच्या घराची चावी प्राप्त करुन फिर्यादी हया दिनांक २४/११/२०२२ रोजी कामानिमीत्त बाहेर गेल्या असताना बनावट चावीने दरवाजा उघडुन घरात प्रवेश करुन वरील गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाले.

आरोपीत अभिषेक राजेंद्र सिंग याचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्यानंतर त्यास सदर गुन्ह्यात अटक करुन त्याचेकडे गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या मुद्देमालाबाबत विचारपुस केली असता त्याने गुन्ह्याचे घटनास्थळावरुन चोरी केलेले सोन्याचे दागीने त्याचा मित्र प्रभात विष्णु सिंग याचेकडे ठेवण्याकरीता दिले असल्याची माहिती दिल्याने सदर गुन्हयातील २,३६,०००/- रुपये किंमतीचे दागिने प्रभात सिंग यांच्याकडून हस्तगत करण्यात आले आहेत. तसेच गुन्हयातील रोख रक्कम २,८०,०००/- रुपये आरोपीताचे निवेदनाप्रमाणे त्याचे राहते घरातुन हस्तगत करण्यात आले आहे.

सदर कामगिरी श्री जयंत बजबळे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ—०१, श्री विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त मिरारोड विभाग, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली

व.पो.निरी/श्री संजय हजारे, पोनि/श्री विजय पवार (गुन्हे), स.पो.निरी/श्री प्रशांत गांगुर्डे, पो.उपनिरीक्षक (श्रेणी) श्री प्रकाश कावरे, पो.हवा.०६०३४ सचिन हुले, पो.हवा./०७१४१ हणुमंत तेरवे, पो.हवा./०७१३६ परेश पाटील, पो.हवा./०७१३९ निलेश शिंदे, पो.हवा./१००४९ सुधीर खोत, पो.हवा./१००५३ राहुल सोनकांबळे, पो.अंम./१२१०० रविंद्र कांबळे व पोहवा./०००२० जयप्रकाश जाधव (पो.उ.आ. कार्यालय,परीमंडळ १) सर्व नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.

